# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004

Ph.: 2539219/6659219, Email: **coe@muhs.ac.in** Website: **www.muhs.ac.in**

MUHS

डॉ. अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
**परीक्षा नियंत्रक**

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations


जा.क्र. मआविवि/एक्स-सी/४०६०/२०२०

दि.:२८/०७/२०२०.

## कार्यालयीन परिपत्रक क्र. : ४६ /२०२०

प्रति,

**मा. अधिष्ठाता/प्राचार्य,**
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था,
पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम,
मआविवि, नाशिक.

**विषय** :- आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेकरिता सोयी सवलती देणेबाबतचा दि.०७/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या परीक्षेच्या (Internal, External, Practical) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ देण्याबाबत...

**संदर्भ** :-
१) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एमईडी१०१७/प्र.क्र.३३१/१७/शिक्षण-२ दि.०७ जुलै २०१८.
२) विद्यापीठामार्फत गठित समितीचा दि.२१/०५/२०१९ रोजीचा अहवाल.
३) विद्यापीठ विद्यापरिषद बैठक दि.१९/१२/२०१९.
४) विद्यापीठ कार्यालयीन परिपत्रक क्र.१९/२०२० दि.१८/०५/२०२०.
५) विद्यापीठ विद्यापरिषद बैठक दि.१५/०७/२०२०.
६) मा. परीक्षा मंडळ बैठक दि.१८/०७/२०२० ठराव क्र.१३/२०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन, आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेकरिता सोयी सवलती देणेबाबत, विद्यापीठामार्फत संदर्भीय पत्र क्र. ०४ अन्वये, परिपत्रक निगर्मित करण्यात आलेल आहे. महाराष्ट्र शासनाच्या दि.०७/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित दिव्यांग विद्यार्थ्यांना, विद्यापीठाच्या सर्व प्रकारच्या परीक्षेच्या (Internal, External, Practical) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ देण्याबाबतचा विषय दि.१८/०७/२०२० रोजीच्या मा. परीक्षा मंडळ बैठकीमध्ये सादर करण्यात आला असता, त्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, खालीलप्रमाणे नमूद वर्गवारीमधील दिव्यांग विद्यार्थ्यांना, विद्यापीठाच्या सर्व प्रकारच्या परीक्षेच्या (Internal, External, Practical) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ देण्याबाबत शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

०१) पूर्णतः अंध (Blindness)
०२) अंशतः अंध (Low Vision / Partial Blind)
०३) कुष्ठरोग निवारित (Leprosy Cured Persons)
०४) कर्णबधिर (Hearing Impairment-deaf and hard of hearing)
०५) बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual disability – Mentally Challenged / Slow Learners)
०६) मानसिक आजार (Mental Illness)
०७) स्वमग्न (Autism Spectrum Disorder)
०८) सेरेब्रल पाल्सी (Cerebral Palsy)
०९) स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)
१०) मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)
११) अध्ययन अक्षम (Specific Learning Disabilities)
१२) बहुविध दृधन उपदयरर (Multiple Sclerosis)
१३) भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability)
१४) थॅलेस्सेमिया (Thalassemia) / कॅन्सर (Cancer)
१५) हिमोफिलिया (Haemophillia)
१६) सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)
१७) बहुविकलांग (Multiple Disabilities)
१८) ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम (Acid Attack Victim)
१९) पार्किसन्स आजार (Parkinson's Disease)

त्याअनुषंगाने, यासंदर्भात ज्या संबंधित दिव्यांग विद्यार्थी / संबंधित महाविद्यालयामार्फत विद्यापीठ कार्यालयास लेखी अर्जाद्वारे, सर्व प्रकारच्या परीक्षेच्या (Internal, External, Practical) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी २० मिनीटे प्रति तास इतका अतिरीक्त वेळ मागणी करण्यात येईल, अशा संबंधित महाविद्यालयामधील दिव्यांग विद्यार्थ्यांना सदर वाढीव वेळ देय राहील, याची नोंद घ्यावी.

त्याअनुषंगाने, सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येवून, संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

कळावे,

आपला,

(डॉ. अजित ग. पाठक)
**परीक्षा नियंत्रक**

**प्रत :**

१) मा. कुलगुरु, मआविवि, नाशिक.
२) मा. प्रति- कुलगुरु, मआविवि, नाशिक.
३) उपकुलसचिव, परीक्षा पूर्व कार्यकक्ष, परीक्षा विभाग.
४) सहायक कुलसचिव, निकाल प्रक्रिया कक्ष, परीक्षा विभाग.
५) कक्षप्रमुख, पदवी/पदव्युत्तर विद्याशाखा, परीक्षा विभाग.
— आपणास सूचित करण्यात येते की, आपल्यामार्फत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना सदर परिपत्रक ई-मेल/शीघ्र टपालाद्वारे पाठविण्यात यावे.
६) विभागप्रमुख, संगणक विभाग, मआविवि, नाशिक.
— आपणास सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रकास विद्यापीठ संकेतस्थळावर (www.muhs.ac.in) व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी.